# ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद सोलापूर

## निविदा सुचना सन 2023-2024

कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद सोलापूर हे **आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सन 2023-24** स्तरावरील निधी मधुन **मौजे जांबुड (सेक्शन नंबर 15)** तालुका **माळशिरस** गावामध्ये **आर.ओ.प्लांट बसविणे** आहे. अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणारे ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निविदा विक्री दिनांक :- 06 / 02 /2024 रोजी सकाळी 10.00 वाजले पासून दिनांक :- 14/02 /2024 रोजी दुपारी 18.00 वाजे पर्यंत यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद, सोलापूर येथे (शासकीय सुट्टी दिवस वगळुन) उपलब्ध राहील.

**निविदेचा तांत्रिक लिफाफा दिनांक :- 15 / 02/2024 रोजी उघडण्यात येईल.**

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | बयाणा रक्कम रुपये | कामपुर्ण करणेची मुदत | अधिकृत ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | मौजे **जांबुड** तालुका **माळशिरस, (सेक्शन नंबर 15)** येथील **आर.ओ.प्लांट बसविणे.** | 2,99,832/- | 3,000/- | 60 दिवस | अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणारे ठेकेदार |

1. उपरोक्त सर्व कामाबाबत निविदा, अटी व शर्ती इत्यादी बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमुद केलेला असून कोऱ्या निविदा संच **उप अभियंता (यांत्रिकी), यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद सोलापूर** येथे मिळतील.
2. उपरोक्त तक्त्यातील कामाचे नावासमोर रकाना क्रं. 04 मध्ये नमुद केलेल्या बयाणा रक्कम धनाकृर्ष मुख्य लेखा वित्त अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर च्या नांवे तयार करुन सदर निविदेतील तांत्रिक लिफाफा कागदपत्रासोबत देणे.
3. निविदेच्या अटी शर्ती बदल करणे, प्राप्त निविदापैकी, एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखुन ठेवला आहे.

**उप अभियंता (यांत्रिकी)**
**यांत्रिकी उपविभाग**
**जिल्हा परिषद सोलापूर**

**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद सोलापूर**

## सविस्तर दरपत्रक सुचना
## 2023-24

1. सदर संपुर्ण निविदा प्रक्रिया निविदाद्वारे ऑफलाईन पध्दतीने आहे. सदर निविदेसंदर्भातील निविदा नोटीस प्रसिध्द, सुचना, शुध्दीपत्रके इत्यादीची माहिती www.zpsolapur.gov.in या संकेतस्थाळावर उपलब्धं आहे.
2. निविदा सोबत खालील बाबी सादर करणे आवश्यक आहे.
   (अ) सदर कामाची कोरी निविदा यांत्रिकी उपविभाग जिल्हा परिषद सोलापूर येथून रकाना क्रं. 4 मध्ये नमुद रक्कमेचा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष / धनादेश जमा करण्यात यावे. संपुर्ण भरण्यात आलेले निविदा विहित वेळेत कार्यालयात जमा करावेत.
3. मक्तेदारांनी निविदा खालील प्रमाणे दोन लिफाफा (Two Envelope) मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

**(अ) तांत्रिक लिफाफा**

1. निविदेचा बयाना रक्कमेचा धनाकर्ष / धनादेश जोडणे
2. शॉप ॲक्ट नोंदणी / उद्योग आधार नोंदणी प्रमाणपत्र
3. **आर.ओ.प्लॉंट उभारणी** दोन योजना पुर्ण केलेले कामाचा अनुभव दाखला जोडणे.
4. पॅनकार्डची स्कॅन केलेली प्रत.
5. जी.एस.टी. प्रमाणपत्राची स्कॅन केलेली प्रत.
6. निविदा नोटीस मधील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे हमीपत्र तसेच निविदे सोबत सादर केलेली सर्व माहिती व कागदपत्र खरी असल्याचे व ती संपुर्ण प्रक्रियेच्या (निविदा सादर करणे ते पेमेंट अदा करणे व त्या नंतर) कोणत्याही वेळी खोटी अथवा चुकीची आढळल्यास त्यास संबंधित ठेकेदार / कंत्राटदार स्वत: जबाबदार व कार्यवाईस पात्र राहतील अश्या आशयाचे प्रतिज्ञापत्र 100 रुपये च्या स्टॅम्पवर देणे.

**(ब) अर्थिक लिफाफा**

- मक्तेदारांनी आपले दर विहीत ठिकाणी मध्ये योग्य त्या जागी भरुन सदरची प्रत स्वतंत्र लिफाफा क्रं. 2 मध्ये ठेवून लिफाफा बंद करावेत.
- लिफाफा क्रं. 1 व लिफाफा क्र. 2 हे दोन्ही लिफाफा क्रं. 3 मध्ये ठेवावेत.

**दरपत्राकाच्या इतर अटी व शर्ती** :

1. दरपत्रकाच्या किंमतीत अंदाजपत्रकानुसार साहित्य सर्व करांसहित पुरवठा करणे, उभारणी करणे, वाहतुक, पॅकींग व साहित्य गाडीत भरणे उत्तरविणे, कार्यान्वित करणे इत्यादी समावेश असेल.
2. निविदेतील सर्व साहित्य निविदेतील तांत्रिक निकषानुसार पुरवठा करावयाचे आहे. निविदेतील तांत्रिक निकषानुसार साहित्य नसल्यास ते स्विकारले जाणार नाही. सदरचे आधिकार उप अभियंता (यांत्रिकी) यांना असतील. सदर साहित्य नाकारले गेल्यास त्यांची जबाबदारी पुरवठाधारकाची राहील.
3. सदर कामाचा पुरवठादार शक्यतो सोलापूर जिल्हयातील असावा अथवा पुरवठादाराचे सोलापूर जिल्हायामध्ये सेवा क्रेंद्र (Service Center) असावे.
4. शासन निर्णय क्रं. बीडीजी 2016 / प्र.क्र.2 / इमा 2 दिनांक :- 12/02/2016 अन्वये निविदा प्रक्रियेमध्ये प्राप्त निविदेचा देकार निविदाधिन कामाच्या किंमतीपेक्षा दहा टक्केयांपेक्षा आधिक दराने कमी असेल तर एवढया कमी दरात काम करण्याचे नियोजनाबाबत सविस्तर तपशिल सादर करण्यात यावा. तसेच निविदेचा देकार निविदाधिन कामाच्या किंमतीपेक्षा 10 टक्क्यांपर्यंत कमी दराचा असेल तर ठेकेदरांनी निविदाधिन किंमतीच्या 1 टक्के एवढया रक्कमेचा धनाकर्ष /

धनादेश परफॉर्मन्स सिक्युरिटी म्हणुन निविदेच्या लिफाफा देकार निविदाधिन कामाच्या किंमतीपेक्षा 10 टक्के पेक्षा जास्त दराने कमी असेल तर दराने 10 टक्के पेक्षा जेवढया दराने कमी आहे. तेवढया रक्कमेचा व वरीलप्रमाणे रक्कमेसह एकत्रित धनाकर्ष / धनादेश दराचा लिफाफा उघल्यावर आठ दिवसात कार्यालयास सादर करणे. (उदा. 14 टक्के कमी दर 10 टक्क्यांपर्यंत 1 टक्का व व 14) - 10 टक्के) - 4 टक्के असे एकूण 5 टक्के)

5. आवश्यक कागदपत्रे / प्रमाणपत्रे सादर करण्यास तांत्रिक अडचणी असल्यास त्याबाबत निविदा स्विकारणे अथवा नाकारणे बाबत अंतिम निर्णय मा. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद सोलापूर यांचा राहिल.
6. निविदा / दरमंजूरी झाल्याचे कळविले नंतर निविदा प्रक्रियेतील कमीत कमी मंजूर दरानुसार कामे करण्यास / पुरवठा करण्यास तयार असल्याचे संमतीपत्र, रुपये 500/- किंमतीच्या स्टँम्प पेपरवर साहित्य पुरवठा तथा अनुषंगीक कामे करण्यास तयार असल्याबाबत जिल्हास्तरावर करारनामा करुन 7 दिवसाच्या आत दयावा लागेल.
7. सदर काम करताना कोणतीही हानी झाल्यास / अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.
8. अंदाजपत्रकातील साहित्याची तांत्रिक तपासणी उपअभियंता (यां), यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद सोलापूर यांच्या कार्यालयाकडून करुन घेतल्या शिवाय योजनेच्या स्थळी साहित्य आस्थापित करण्यात येऊ नये.
9. **अ)** पुरवठा आदेश मिळाले पासुन 2 महिन्याचे आत काम पुर्ण करणे आवश्यक आहे.
   **ब)** जर कंत्राटदाराने विहित मुदतीत आदेशित काम पुर्ण केले नाही तर किंवा विलंबाचा संयुक्तीक खुलासा न केल्यास आदेशीत कामाच्या पैकी बाकी असलेल्या कामाच्या किंमतीच्या अर्धा टक्का प्रति आठवडा या दराने दंड वसूल करण्यात येईल. हा दंड जास्तीत जास्त 5 टक्के रक्कम व अतिरिक्त सुरक्षा रक्कम जप्त करण्यात येईल. त्यानंतर सदरच्या मक्तेदारांचे नांव काळया यादीत समाविष्ठ करण्यात येईल. पुन्हा फेर निविदा करुन काम पुर्ण करण्यात येईल.
10. देयकातुन सुरक्षा रक्कम, आयकर, जी.एस.टी. जिपसेस व इतर सर्व करांची शासकीय नियमानुसार वजावट करुन देयक अदा करण्यात येईल.
11. मक्तेदारांनी कामाचे नकाशे, निविदेतील अटी व शर्तीनुसार Specifications कामाचे स्थळ मंजुर व साहित्याची उपलब्धता या सर्व बाबीचा अभ्यास करुन निविदा सादर कराव्यात.
12. मक्तेदारांनी सादर केलेली निविदा व निविदेतील दर, लिफाफा क्रं. 2 उघउले नंतर 90 दिवसा पर्यंत वैध राहतील.
13. निविदेतील सर्व वा कोणतीही अटी वा शर्ती पुर्ण न करणाऱ्या मक्तेदाराच्या निविदा व अर्धवट सादर केलेल्या निविदा अपात्र समजल्या जातील.
14. कोणत्याही अटीवर (Conditional) आधारित दरपत्रके स्विकारल्या जाणार नाहीत अथवा स्विकारल्या तरी मंजूर केल्या जाणार नाहीत.
15. निविदेच्या अटी व शर्ती मध्ये बदल करणे, प्राप्त निविदा पैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्दचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला आहे.
16. संक्षिप्त निविदा सुचना व सविस्तर सुचना निविदा तंत्राचा एक भाग राहील.
17. कोणत्याही बाबीसाठी काही तंटा निर्माण झाल्यास त्याबाबत न्यायालयात जाता येणार नाही.

**उप अभियंता (यांत्रिकी)**
**यांत्रिकी उपविभाग**
**जिल्हा परिषद सोलापूर**

**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद सोलापूर**